मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवडकरांनो कारवाई टाळा..; महापालिकेचे आवाहन

## 31 मार्चपूर्वी मिळकतकराचा भरणा करा : मालमत्तांधारकांकडून अद्यापही 87 कोटींचा कर येणे बाकी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरातील मालमत्ता सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. मालमत्ता सर्वेक्षणांतर्गत नव्याने निदर्शनास आलेल्या प्रत्येक मालमत्तेच्या मालमत्ताधारकांना महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतूदीनुसार विशेष नोटीस देणेत येऊन आज अखेर ८९,००६ नवीन मालमत्ताधारकांना मालमत्ताकराचे अंतिम बिल प्रथमच वाटप केले असून या मालमत्तांची रुपये १६७ कोटी कराची मागणी निश्चिती कार्यवाही सुध्दा पूर्ण झाली आहे. यापैकी आत्तापर्यंत ४७ हजार ४४८ मालमत्ताधारकांनी ७७ कोटीं कराचा भरणा महानगरपालिकेकडे केला आहे. त्याचबरोबर, ४१,५५८ मालमत्तांधारकांकडे अद्यापही ८७ कोटींचा कर येणे बाकी आहे. त्यांची करवसुली त्यांना एसएमएस, फोन, टेलिकॉलिंग करुन कार्यवाही सुरु आहे. मालमत्ता सर्वेक्षणाच्या माध्यमातून शहरामध्ये ज्या नव्या मालमत्तांची आकारणी झालेली आहे अशा मालमत्ताधारकांनी आपल्या मालमत्ताकराचा तत्काळ भरणा करावा. असे आवाहन करंसकलन विभागाकडून करण्यात आले आहे.




ज्या मालमत्तांची चालू वर्षी नव्याने आकारणी झाली आहे, अशा मालमत्तांना बिल लागू झाल्यापासून तीन महिन्यांपर्यंत विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. आत्तापर्यंत ३०,४४० मालमत्ताधारकांनी मालमत्ताकरावरील सवलतींचा लाभ घेतला आहे. सवलतीमध्ये ऑनलाइन स्वरूपात कर भरल्यास ५ टक्के, महिलांच्या नावे असलेल्या एका निवासी घरास ३० टक्के, दिव्यांग व्यक्तींच्या नावे असलेल्या मालमत्तेस ५० टक्के, झिरो वेस्ट आणि 'एसटीपी प्लँट' कार्यान्वित असल्यास १० टक्के, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारल्यास २ टक्के, ग्रीन बिल्डिंग रेटिंगमध्ये ३ ते ५ रेटिंग असणाऱ्या मालमत्तांना ५ ते १० टक्क्यांच्या सवलतींचा लाभ घेता येणार आहे.

> शहरातील सर्व प्रकारच्या मालमत्तांचे मालमत्ता सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आले असून नवीन आकारणी झालेल्या मालमत्तांना बिलांचे वाटपसुध्दा करण्यात आले आहे. सदर मालमत्ताधारकाकडे तब्बल ८७ कोटींचा कर येणे बाकी असून यापैकी काही मालमत्ता सवलतीस पात्र आहेत. त्यामुळे ज्या मालमत्ताधारकांना बिल लागू झाल्यापासून तीन महिन्यांचा काळ पूर्ण झालेला नाही अशा मालमत्ताधारकांनी ३१ मार्चपूर्वी कराचा भरणा करुन सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका**

> नव्याने आकारणी झालेल्या मालमत्ताधारकांनी आपल्या कराचा ऑनलाइन स्वरुपात भरणा करुन त्यावरील विविवि सवलतींचा लाभ घ्यावा. शहरातील नव्याने आकारणी झालेल्या मालमत्ताधारकांनी ३१ मार्चपूर्वीच चालूवर्षाचा कर भरुन आपली मालमत्ता थकबाकीदारांच्या यादीमध्ये न येण्यापासून टाळावी. त्यासोबतच ज्या मालमत्ताधारकांनी आपले बिल मिळण्यासाठी विशेष नोटीस स्वीकारल्यानंर आवश्यक कागदपत्रांची पुर्तताकरण्यासाठी ऑनलाइन प्रक्रियेचा अवलंब करुन मालमत्ताकराचे बिल उपलब्ध करुन घ्यावे.
>
> **- प्रदीप जाभंळे – पाटील, अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी – चिंचवड महानगरपालिका**

# शबरी आदिवासी घरकुल योजना शहरी भागातही राबवावी : आमदार शंकर जगताप

## मोरवाडी येथे संस्थेची इमारत आहे. मात्र, सदर इमारत जुनी झाली असून, ही जागा अपुरी पडत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत आदिवासी बांधव व विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांबाबत ठोस मुद्दे मांडत आवाज उठवला. त्यांनी शबरी आदिवासी घरकुल योजना केवळ ग्रामीणच नव्हे, तर शहरी भागातही राबवण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले. अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सोयी-सुविधांच्या अभावामुळे अनेक पालक आपल्या मुलांच्या भविष्यासाठी पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्यास आहेत. मात्र, त्यांच्या मूलभूत गरजांकडे अद्यापही प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे याकडे आमदार जगताप यांनी सरकारचे लक्ष वेधले.

शहरातील आदिवासी कुटुंबांना सुरक्षित निवारा मिळावा यासाठी 'शबरी आदिवासी घरकुल योजना' कार्यान्वित करणे गरजेचे आहे. सध्या अनेक आदिवासी बांधव त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी इथे शहरात येऊन भाड्याने राहतात. ही योजना लागू झाल्यास त्यांना हक्काचे घरकुल मिळू शकते आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.



आदिवासी समाजाच्या हक्कांचे रक्षण आणि त्यांच्या योगदानाला सन्मान देण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी 'जागतिक आदिवासी दिन' साजरा केला जातो. पर्यावरण संरक्षण, सामाजिक विकास आणि नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन यामध्ये आदिवासी समाजाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे हा दिवस राज्यातील सर्व महानगरपालिका स्तरावर मोठ्या प्रमाणावर साजरा केला जावा.

याच अनुषंगाने, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी सामूहिक उत्सव, चर्चासत्रे आणि जनजागृती मोहिमा राबविण्याची गरज आहे. यामुळे समाजातील नागरिकांमध्ये आदिवासी हक्कांबाबत जागरूकता निर्माण होईल आणि त्यांच्या विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलली जातील. अशी मागणी त्यांनी केली आहे. सरकारने या समस्यांवर तातडीने कार्यवाही करून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा आहे.

### वाकड येथील आदिवासी वस्तीगृहातील सुविधांचा अभाव

» पिंपरी चिंचवड शहरात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वाकड येथे वसतीगृह बांधण्यात आले आहे. मात्र, येथे आवश्यक सोयी-सुविधांचा मोठा अभाव आहे. विशेषतः वसतीगृहात भोजनालय असले तरीही ते अद्याप सुरू झालेले नाही, त्यामुळे विद्यार्थी भोजनासाठी बाहेरील खाद्यपदार्थांच्या स्टॉल किंवा हॉटेलवर अवलंबून राहतात. यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. आमदार शंकर जगताप यांनी याबाबत विधानसभेत सरकारचे लक्ष वेधत विद्यार्थ्यांसाठी भोजनालय सुरू करण्याची मागणी केली आहे.

# पाण्याचा अधिक वापर केल्यास सोसायट्यांचे नळ कनेक्शन तोडणार ; महापालिकेचा इशारा

## शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरामध्ये गेल्या दोन महिन्यांपासून पाण्याची मागणी वाढली असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

वाढत्या उष्णतेमुळे शहरातील पाण्याची मागणी वाढली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरामध्ये गेल्या दोन महिन्यांपासून पाण्याची मागणी वाढली असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे. शहरातील प्रत्येक नागरिकाला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेला मोठी कसरत करावी लागत आहे. असे असताना सोसायट्यांकडून जादा पाणी वापर होत असल्याचे समोर आले आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने नोटिस दिल्यानंतरही सोसासट्यांकडून झोपे सोंग घेतले जात आहे. त्यांची झोप उडविण्यासाठी आता नोटिस नाही तर थेट नळ कनेक्शन तोडले जाणार असल्याचा कडक इशारा पाणीपुरवठा विभागाने दिला आहे.

महापालिकेकडून समान पाणी पुरवठा योजनेचा आढावा घेतला जात आहे. समान पाणीपुरवठा योजनेनुसार जलवाहिन्या टाकण्याचे काम तसेच किती पाणी मीटर बसविण्यात आले आहेत. याची माहिती घेतली जात आहे. समान पाणी योजने अंतर्गत शहरातील सोसायट्या तसेच स्वतंत्र निवासी मिळाकतींना पाण्याचे मीटर बसविण्यात आले आहेत. या मीटरमुळे पाण्याचा अधिक वापर होत असल्याची माहिती समोर आली आहे. पाणी वापर मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अशा सोसायट्या,घरांना पाण्याचा वापर कमी करण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. मात्र, त्यानंतरही या सोसायट्या पालिकेच्या नोटीसांना जुमानत नसल्याचे दिसून येते. त्यावर आता महापालिकेने थेट कारवाईचा बडा उगारण्याचे धोरण स्वीकारले आहे. आता नोटीस पाठविण्यापेक्षा थेट त्यांचा पाणीपुरवठाच बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यासोबतच तातडीने टाक्यांची गळती तसेच पाणी नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

शहरात समान पाणी योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत शहरातील पाणीपुरवठ्याचे १४१ झोन तयार करण्यात आले आहेत. त्यातील ४७ झोन तयार झाले आहेत काही सोसायट्यांचा पाणी वापर ५०० ते ६०० लीटर पेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे, अशा सोसायट्यांची पाहणी महापालिकेने केली असता सोसायटीच्या टाकीला गळती असणे, टाकी भरल्यानंतर पाणी बंद करणारी यंत्रणा नसणे, टाकी भरल्यानंतरही पाणी बंद केले जात नसल्याचे प्रकार समोर आले आहे. त्यामुळे अशा सोसायट्यांना महापालिकेने जादा पाणी वापराच्या नोटीसा देत पाणी वापर कमी करावा तसेच पाण्याची गळती रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत



### महापालिकेकडून शहरात समान पाणी योजना

» महापालिकेकडून शहरात समान पाणी योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत पालिकेकडून शहरातील पाणीपुरवठ्याचे १४१ झोन तयार करण्यात आले आहेत. त्यातील ४७ झोन तयार झाले आहेत. तर, ४१ झोनमध्ये मीटरद्वारे मुख्य टाकीतून सोडण्यात आलेले पाणी, सोसायटीच्या टाकीत पडलेले पाणी याची मोजणी केली जात आहे. त्यानुसार,प्रती व्यक्ती १३५ लीटरप्रमाणे सोसायटीने पाणी घेणे आवश्यक आहे. मात्र, काही सोसायट्यांचा पाणी वापर ५०० ते ६०० लीटर पेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे,

### उपाययोजना करण्याच्या सूचना

» सोसायट्यांची पाहणी महापालिकेने केली असता सोसायटीच्या टाकीला गळती असणे, टाकी भरल्यानंतर पाणी बंद करणारी यंत्रणा नसणे, टाकी भरल्यानंतरही पाणी बंद केले जात नसल्याचे प्रकार समोर आले आहे. त्यामुळे अशा सोसायट्यांना महापालिकेने जादा पाणी वापराच्या नोटीसा देत पाणी वापर कमी करावा तसेच पाण्याची गळती रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र, त्याकडे दूर्लक्ष होत असल्याने संबंधितांचा पाणीपुरवठा बंद करण्याबाबत प्रशासनाकडून चर्चा सुरू आहे.

# उन्हाळ्यात शुगर वाढण्याचा धोका अधिक? काळजी घेण्याचे आवाहन

## रुग्ण दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत, बदललेली जीवनशैली अन् ताण यामुळेच प्रमाण वाढले आहे.

**मोशी | प्रतिनिधी**

मधुमेह हा असा आजार आहे.ज्याचे रूग्ण दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत.बदललेली जीवनशैली अन् ताण यामुळेच प्रमाण वाढले आहे. त्यावर उपचार घेऊनही तो रोग समुळ नष्ट करता येत नाही.याचे कारण म्हणजे हा आजार थेट लोकांच्या आवडीच्या गोड पदार्थावर मारा करतो. त्यामुळे लोक या आजाराला कंटाळलेले असतात. मधुमेहात लोकांना सतत खावंस वाटू शकतं. त्यांना सतत तहान लागू शकते. त्यामुळे हा आजार असलेल्या लोकांनी योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे. टाइप १ आणि टाइप २ असे दोन प्रमुख प्रकार आहेत. या आजाराने त्रस्त लोकांसाठी प्रत्येक ऋतू आव्हाने घेऊन येतो.

आता उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. ज्या लोकांना मधुमेह आहे. त्यांचे शरीर डिहायड्रेड होऊ शकते. कारण शरीरात साखरेची पातळी जास्त असते. तेव्हा मुत्र विसर्जनाचे प्रमाण जास्त असते. ज्यामुळे मधुमेहाचे रुग्ण डिहायड्रेशनचे बळी ठरतात.उन्हाळ्यात मधुमेहावर नियंत्रण ठेवणं खूप गरजेचं आहे. उन्हाळ्यात शरीर डिहायड्रेड होण्यापासून वाचवले पाहिजे, असे एम.डी.मेडिसीन डॉ.भाग्यश्री लहाणे-मुंढे यांनी सांगितले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात शुगर पेशंटनी नक्की काय काळजी घ्यायची हे पाहुयात.

सर्वात आधी कोणता बदल करणे गरजेचे असेल तर तो म्हणजे एक्टीव्ह होणे. जेवण झाल्यावर तीन तासांनी अर्ध्या तास चालले पाहिजे. रात्रीच्या जेवणानंतरही शतपावली केली पाहिजे.

#### फायबरचे पदार्थ खा

मधुमेह असलेल्या लोकांसाठी उच्च फायबरयुक्त आहार घेणे खूप महत्वाचे आहे. जास्त प्रमाणात फायबर असलेले अन्न पचन मंदावते आणि रक्तातील साखर वाढण्यास प्रतिबंध करते. असे खाद्यपदार्थ खाल्ल्याने वजन कमी होण्यासही मदत होते. फायबरयुक्त पदार्थांमध्ये संपूर्ण धान्य जसे की ओट्स, ब्राऊन राइस, संपूर्ण धान्य ब्रेड आणि तृणधान्ये, फळे, बिया, नट, भाज्या जसे की झुचीनी, गाजर, टोमॅटो इ.मोड आलेले धान्य तुम्हाला दिवसभर फ्रेश ठेवतील



#### सरबत प्या पण..

उन्हाळ्यात सर्वात जास्त कोणतं पेय पिलं जात असेल.तर ते सरबत होय. सरबतामुळे आपलं शरीर डिहायड्रेड होण्यापासून बचाव होतो. पण, शुगर असलेल्या लोकांनी साखरेपासून बनवलेल्या गोड सरबतापासून दुर रहावे. त्यामुळे जास्त त्रास होण्याची शक्यता असते.

#### पाण्याचे सेवन

उन्हाळ्यात जास्त प्रमाणात पाण्याचे सेवन करा.दिवसाला तीन लिटर पाणी आपल्या शरीराला हवं असतं. तर, शुगर असलेल्या रूग्णांनी पाणी जास्त पिल्याने शरीरातील अतिरिक्त साखर मुत्रावाटे निघून जाते. आणि शरीरातील साखरेचे प्रमाणही कमी होते. पाणी जास्त पिल्याने शरीर हायड्रेड ठेवण्यास मदत होईल.

#### शुगर तपासणे

मधुमेह असलेल्या लोकांनी शुगर सतत तपासली पाहिजे. मधुमेहाची पातळी लक्षात आली तर त्यामुळे किती सारखेची गरज आहे? हे लक्षात येते. त्या प्रमाणावरून काय खावे, काय नाही हे ठरवणे सोपे जाते.तुम्हाला इन्सुलिनचे सेवन देखील बदलण्याची आवश्यकता असू शकते म्हणून उन्हाळ्याच्या महिन्यांत तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

#### उन्हात फिरू नका

तुम्हाला माहिती आहे का ? सनबर्नमुळे शरीरावर विपरीत परिणाम होतो आणि रक्तातील साखरेची पातळी वाढते. म्हणून सनस्क्रीनचा वापर करा तसेच बाहेर जाताना टोपी, सनग्लासेस आणि छत्री वापरा.

#### कॅफिन सेवन कमी करा

उन्हाळ्यात कॉफी किंवा इतर कोणतेही एनर्जी ड्रिंकसारख्या कॅफिनचे सेवन केल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते.

#### फळांचे सेवन करावे?

आपल्याकडचा उन्हाळा हा सुट्यांचा काळ असतो. त्यामुळे लोक सुट्टीवर जातात. बाहेरचे खाणे वारंवार होते. शिवाय, आंबाप्रेमी मधुमेहींना या दिवसांत अधिक त्रास झाल्याचे दिसून येते. आंब्यासारख्या रसदार फळांमध्ये साखरेचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे या दिवसांत आंब्यामुळे मधुमेह वाढण्याचे प्रमाणही रुग्णांमध्ये जास्त दिसून येत असल्याची माहिती डॉ. भाग्यश्री लहाणे मुंढे यांनी दिली.

# 'व्हिजन @50' मध्ये शहरातील सर्वच क्षेत्रांचा होणार समावेश

## ग.दि. माडगूळकर नाट्यगृह येथे बाह्य स्टेकहोल्डर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

**पिंपरी | प्रतिनिधी**

'पिंपरी चिंचवड महापालिका स्थापनेस २०३२ मध्ये ५० वर्षे पुर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने महापालिकेने 'व्हिजन@५० शहर धोरण' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत सर्वच क्षेत्रांतील व्यक्तींशी संवाद साधून पिंपरी चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्नशील आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले.



'व्हिजन@५० शहर धोरण' उपक्रम अंतर्गत ग.दि. माडगूळकर नाट्यगृह येथे बाह्य स्टेकहोल्डर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी मार्गदर्शन करताना जांभळे पाटील बोलत होते.

या कार्यशाळेस शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता मनोज सेठीया,देवण्णा गट्टुवार, उप आयुक्त विठ्ठल जोशी, अण्णा बोदडे, संदीप खोत,पंकज पाटील, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अभयचंद्र दादेवार,सहायक आयुक्त उमेश ढाकणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुपेकर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी याप्रसंगी व्हिजन@५० बाबत बोलताना सांगितले की,'पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस ११ ऑक्टोबर २०३२ रोजी महापालिका स्थापनेपासून ५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्या अनुषंगाने करावयाच्या आदर्श उपाययोजनेबाबतीत आयुक्त शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू झाला आहे. या अंतर्गत विविध क्षेत्रातील व्यक्तींशी चर्चा करण्यात येत असून आदर्श शहराबाबतीत त्यांचे मत जाणून घेण्याच्यादृष्टीने ही कार्यशाळा यशस्वी ठरत आहे. आपल्या शहराची ओळख ही औद्योगिक नगरी म्हणून आहे. शहराचा विकास करताना शिक्षण, पर्यावरण, क्रीडा, शहरी विकास व वाहतूक अशा विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी या उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींच्या कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत. लोकप्रतिनिधींपासून अगदी सामान्य व्यक्तीपर्यंत प्रत्येकाला या उपक्रमात सहभागी करून घेतले जात आहे. या अनुषंगाने अशा कार्यशाळांचे आयोजन केले जात आहे,' असेही जांभळे पाटील यांनी सांगितले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना उप आयुक्त विठ्ठल जोशी यांनी सांगितले की, 'पिंपरी चिंचवड शहराचा विकास करण्यास महानगरपालिकेने नेहमीच प्राधान्य दिले आहे. आता व्हिजन@५० उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या क्षेत्रातील नागरिकांचे मत विचारात घेत आहोत. महानगरपालिकेला ५० वर्ष पूर्ण करीत असताना आपल्या शहराची स्थिती काय असावी, यावर लक्ष केंद्रित करण्यास असे उपक्रम यशस्वी ठरत आहेत.'

या कार्यशाळेत नारदेव माही संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष स्मिता पाटील, लघु उद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, लघु उद्योग संघटना फोरमचे अध्यक्ष अभय भोर, आकांक्षा फौंडेशनच्या वरिष्ठ संचालक शिवकामी कोतला, मर्दानी खेल असोसिएशनच्या अध्यक्ष संजय बनसोडे, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड अध्यक्ष राजेन लाखे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.ललितकुमार धोका, पीसीसी बॉक्सिंग असोसिएशनचे प्रकाश काकडे, पिंपरी चिंचवड होलसेल असोसिएशनचे महेश मोटवानी, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप बटवाल, संजय शिंदे, सीईपीएल व्यवस्थापकीय संचालक मोहन साखळकर, वास्तुविशारद अथर्वी नेत्रगावकर, इको सोल्युशन संचालक डॉ.अनुशोल गुजराथी, पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वार प्रशिक्षण केंद्रचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, बिस्लेरीचे सीएसआर प्रतिनिधी आप्पासाहेब ढाकणे यांच्यासह विविध संघटना, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, नागरिक आदींनी सहभाग घेऊन चर्चासत्रात भाग घेतला. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले.

### विविध विषयांवर झाले विचारमंथन

» व्हिजन@५० शहरी धोरण उपक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत 'शहरी गतिशीलता', 'पर्यावरण आणि राहणीमान', 'शिक्षण आणि नागरी कल्याण', 'तंत्रज्ञान आणि प्रशासन', 'शहरी पायाभूत सुविधा', 'आर्थिक विकास' या प्रमुख विषयांवर सविस्तर चर्चा झाली. तसेच भविष्यात नागरी समस्या उद्भवल्या तर त्यासाठी कोणत्या उपाययोजना उपयुक्त ठरतील, यावरही विचारमंथन झाले.

# मंगरूळमध्ये अवैध वृक्षतोड, गौण खनिजांचे उत्खनन

## दोषींवर कारवाई करा ; आमदार सुनील शेळके यांची लक्षवेधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील मंगरूळ येथे मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड आणि गौण खनिजांचे उत्खनन झाल्याचे उघड झाले आहे. वनक्षेत्र म्हणून राखीव असलेल्या गट क्रमांक ४१ ते ४९ मध्ये सुमारे ८०० ते ९०० झाडे तोडली गेली असून, ४० ते ४५ हजार ब्रास माती, मुरूम आणि डबर यांचे उत्खनन करण्यात आले आहे. पर्यावरणाची झालेली हानी व अधिकाऱ्यांची दुर्लक्षित भूमिका यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या प्रकरणी आमदार सुनिल शेळके यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडत, संबंधित अधिकारी आणि जमीनमालकांवर कारवाईची मागणी केली आहे.



पर्यावरण प्रेमी व ग्रामस्थांनी या वृक्षतोडीबाबत वारंवार तक्रारी केल्या होत्या. डिसेंबर २०२४ मध्ये या वृक्षतोडीचा आणि उत्खननाचा प्रकार उघडकीस आला. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. विशेष म्हणजे, गट क्रमांक ४२ आणि ४६ हे वनक्षेत्रात समाविष्ट असूनही, उपजिल्हाधिकाऱ्यांनी त्याठिकाणी परवानगी दिल्याचे समोर आले असून या परवानगीचा गैरफायदा घेत सुमारे ३ लाख ६१ हजार ब्रास उत्खनन केल्याचे दिसून आले. या प्रकरणी आमदार सुनिल शेळके यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडत, संबंधित अधिकारी आणि जमीनमालकांवर कारवाईची मागणी केली आहे.

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे उत्तर

» आमदार शेळके यांच्या लक्षवेधीवर मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत उत्तर देताना सांगितले की, गट क्रमांक ३५, ३६, ३७, ३८, ४१, ४२ आणि ४६ या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उत्खनन झाले आहे. त्यापैकी ३५, ३६, ३७ आणि ३८ हे खाजगी गट असून, त्यांना दहा वर्षांचा खाणपट्टा मंजूर करण्यात आला आहे. तथापि, ४१, ४२ आणि ४६ हे वनक्षेत्र राखीव असल्याने तिथे कोणत्याही प्रकारचे उत्खनन किंवा वृक्षतोड होऊ नये. मात्र, या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर उत्खनन झाले आहे.

### अवैध उत्खनन, वृक्षतोड करणाऱ्यांवर कडक कारवाई

» मंत्री बावनकुळे यांनी याप्रकरणी विभागीय आयुक्त चौकशीचे आदेश दिले असून, एका महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी परवानगी चुकीच्या पद्धतीने दिली आहे का, याची सखोल तपासणी केली जाणार आहे. तसेच, वनक्षेत्रामध्ये अवैध उत्खनन आणि वृक्षतोड करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले आहे. शासन स्वतःच्या यंत्रणेमार्फत सर्वेक्षण करून दोषींवर गुन्हे दाखल करणार आहे.

# डोंगर उतारावर पिकवली रसाळ स्ट्रॉबेरी

## एक एकर शेतीतून स्ट्रॉबेरीपासून आतापर्यंत पाच लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

हिर्डोशी,धामणदेववाडी (ता. भोर) येथील प्रयोगशील शेतकरी सुरेश कोंडिबा गोरे यांनी नगदी पीक असलेल्या स्ट्रॉबेरीचे पीक घेत आदर्श निर्माण केला आहे. पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या सुरेश गोरे यांनी पोलीस भरतीसाठी प्रयत्न करत असताना अचानक गावातच राहून शेती व्यवसाय करण्याचे ठरवले. त्यातच त्याने स्ट्रॉबेरी पीक घेण्याचा निश्चय केला. एक एकर शेतीतून स्ट्रॉबेरीपासून आतापर्यंत पाच लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात स्ट्रॉबेरी शेतीसाठी गावातच नाचणीची शेती करत असलेले १ एकर क्षेत्र निवडले. यासाठी महाबळेश्वर येथील राजेंद्र ढेबे यांच्या श्रेयस स्ट्रॉबेरी फार्ममधून २६ हजार रोपे आणली. यात १७,५०० विंटरडाउन जातीचे रोपं ५ रुपयेप्रमाणे आणि आर वन आणि नाबिला जातीचे रोपं १३ रुपयेप्रमाणे विकत आणली.

नाचणी शेतीची लागवडपूर्व मशागत करून साडेचार फुटाचा डबलबेडवर एक फूट बाय एक फूट अंतरावर मल्चिंग पेपर अंथरुन रोपांची लागवड केली. ठिबकने पाणी दिले. रोपांची योग्य निगा, खतांचा वापर केला. जंगल भागात शेती असल्याने वन्य प्राण्यांपासून शेतीचे मोठे नुकसान होत असल्याने कापडी कुंपण केले.



### कुटुंबीयांचे पाठबळ

» स्ट्रॉबेरी शेतीसाठी सुरेश याला आई येसाबाई गोरे, वडील कोंडिबा गोरे व भाऊ मारुती गोरे यांचे योगदान असते. तसेच महाबळेश्वर येथील सुप्रिया व राजेंद्र ढेबे या दांपत्यांचे मार्गदर्शन असते. आई शेतात काम करून भोर महाड मार्गावरील हिर्डोशी वारवंड दरम्यान असणाऱ्या पुलाजवळ स्टॉल लाऊन स्ट्रॉबेरी विक्री करत आहेत. तर सुरेश हा पुणे येथे जाऊन थेट ग्राहकांपर्यंत पोहचून स्ट्रॉबेरी विक्री करत आहे. थेट ग्राहकांपर्यंत गेल्याने समाधानकारक भाव मिळत आहे.

### तहसीलदार यांच्याकडून पाहणी

» सलग दुसऱ्या वर्षी स्ट्रॉबेरी पीक घेतल्याने भोर तहसीलदार राजेंद्र नजन यांनी धामणदेववाडी येथे शेतीची पहाणी करून स्ट्रॉबेरी पिकाची माहिती घेतली. दुर्गम डोंगरी भागात नगदी पीक घेतल्याने तहसीलदार राजेंद्र नजन यांनी प्रयोगशील शेतकरी सुरेश गोरे यांचे कौतुक केले. या प्रसंगी नायब तहसीलदार आजीनाथ गाजरे, मंडलाधिकारी रुपाली गायकवाड, शैला धामुणसे उपस्थित होते.

### जीवांमृतामुळे फळाचा गोडवा वाढला

» सध्या फळे झाडाला पिकल्याने गोडवा जास्त असून, सरासरी १०० रुपये बाजारभाव मिळत आहे. चांगले उत्पादन मिळण्यासाठी शेणखत, लेंडी खत, जीवांमृताचा वापर केल्यामुळे फळाचा गोडवा वाढला आहे.

> स्ट्रॉबेरीच्या १ एकर शेतीतून आतापर्यंत पाच लाख रुपयांचे उत्पादन मिळाले आहे. चांगला बाजारभाव मिळाल्यास किमान तीन लाखांपर्यंत उत्पादन मिळण्याची अपेक्षा आहे. ग्रामीण भागातील युवकांनी कामधंद्यासाठी शहरांकडे स्थलांतर करण्यापेक्षा शेतीत वेगवेगळे प्रयोग करून गावातच रोजगार उपलब्ध करून यशस्वी व्हावे.
>
> - सुरेश गोरे, शेतकरी, हिर्डोशी धामणदेववाडी

# जागेची मालकी बदलली तरी थकबाकी चुकत नाही: महावितरण अभय योजनेचा लाभ घ्या अन् थकबाकीमुक्त व्हा; महावितरणचे आवाहन

## कायमस्वरूपी बंद असलेल्या बिगरशेती ग्राहकांसाठी महावितरणची अभय योजना सुरु आहे. योजनेची मुदत 31 मार्चला संपणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**


सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार, वीजबिलांची थकबाकी असलेल्या एखाद्या जागेची मालकी बदलली तरी नवीन जागा मालकाला थकबाकी चुकत नाही ती भरावीच लागते. अशा कायमस्वरुपी बंद असलेल्या बिगरशेती ग्राहकांसाठी महावितरणची अभय योजना सुरु आहे. योजनेची मुदत ३१ मार्चला संपणार आहे. तत्पूर्वी पात्र ग्राहकांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

वीजबिलांच्या थकबाकीमुळे दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित झालेल्या तसेच कृषी व सार्वजनिक पाणीपुरवठा योजना वगळून उर्वरित सर्व बिगरशेती वीजग्राहकांसाठी महावितरण अभय योजना दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत सुरू आहे.

थकबाकीदारांनी केवळ मूळ थकबाकीचा भरणा केल्यास संपूर्ण १०० टक्के व्याज व विलंब आकार (दंड) माफ होत आहे. मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास लघुदाब ग्राहकांना १० टक्के तर उच्चदाब ग्राहकांना ५ टक्के अतिरिक्त सूट मिळत आहे. यासोबतच सुरवातीला मूळ थकबाकीच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम व्याजमुक्त सहा हप्त्यांत भरण्याची देखील सोय आहे. तसेच लाभार्थी ग्राहकांना मागणीनुसार त्या जागेवर नव्याने जोडणी दिली जाणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी मोजकेच दिवस शिल्लक असून थकबाकीमुक्तीसाठी वीजग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरण बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी केले आहे.

बारामती परिमंडलात २ लाख ७७ हजार ४७२ ग्राहक अभय योजनेसाठी पात्र होते. यामध्ये बारामती मंडलात ६७ हजार २९३, सातारा ५४ हजार ८९६ व सोलापूर जिल्ह्यात १ लाख ५५ हजार २५० ग्राहकांचा समावेश आहे. मात्र यातील बारामती मंडलात ३३२४, सातारा मंडल १८९३ व सोलापूर मंडलातील ५५९८ ग्राहकांनी आतापर्यंत अभय योजनेचा लाभ घेत अनुक्रमे ३ कोटी ६० लाख, २ कोटी ३५ लाख व ४ कोटी ६८ लाख असा १० कोटी ६५ लाखांचा भरणा केला आहे. लाभार्थी पैकी ४२०४ ग्राहकांनी आहे ते कनेक्शन पुर्नजोडणी केले. तर २९७९ ग्राहकांनी नव्याने वीज जोडणी घेतली.

वीजबिलांची थकबाकी असलेल्या एखाद्या जागेची मालकी बदलली तरी नवीन जागा मालकाला थकबाकी चुकत नाही ती भरावीच लागते. अशा कायमस्वरुपी बंद असलेल्या बिगरशेती ग्राहकांसाठी महावितरणची अभय योजना सुरु आहे. योजनेची मुदत ३१ मार्चला संपणार आहे. तत्पूर्वी पात्र ग्राहकांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. अभय योजनेत सहभागी होण्यासाठी महावितरणच्या WWW.MAHADISCOM.IN या संकेतस्थळावर तसेच मोबाईल ॲपमध्ये सुविधा उपलब्ध केली आहे. ऑनलाईन शक्य नसल्यास अधिक माहितीसाठी नजीकच्या कार्यालयात संपर्क साधावा.




### महावितरणचे आवाहन

» वीजबिलांची थकबाकी असलेल्या एखाद्या जागेची मालकी बदलल्यानंतर देखील नवीन मालक किंवा ताबेदार यांच्याकडून थकबाकीची रक्कम वसूल करण्याचा अधिकार वीज वितरण कंपन्यांना असल्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने निकालात स्पष्ट केले आहे. त्यामुळे थकीत वीजबिलांमुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेली जागा थकबाकीमुक्त करण्यासाठी अभय योजनेचा लाभ घ्यावा